| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 06 Nov 2017 | Publication: | Punyanagari |
| Edition: | Mumbai | Page No: | 01 |



# टीसीएस आयटी प्रश्नमंजुषाचे आयोजन

**। मुंबई :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) कंपनीने आयटी प्रश्नमंजुषा २०१७ च्या मुंबई पर्वाचे आयोजन केले आहे. शालेय विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानावर आधारित असलेली सर्वात मोठी प्रश्नमंजुषा १९ नोव्हेंबर रोजी इंडियन एज्युएकेशन सोसायटी, माणिक सभागृह, लीलावती हॉस्पिटलच्या समोर, वांद्रे रिक्लमेशन, मुंबई येथे रंगणार आहे. आठवी ते १२वीपर्यंत शिकणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. प्रत्येक संस्थेला अनेक संघ पाठवता येईल. प्रत्येक संघात दोन विद्यार्थ्यांचा समावेश असेल. या प्रश्नमंजुषेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ ही भारतातील १२ शहरांमध्ये रंगणार आहे. अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या १२ शहरांमध्ये ही स्पर्धा घेतली जाणार आहे.